I.I.F.-I (एकीकृत अन्वेषणफॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)

## प्रथम खबर अहवाल

(बी एन एस एस संहिताच्या कलम 173 अन्वये)

1. **District (जिल्हा):** अमरावती शहर **P.S. (पोलीस ठाणे):** गाडगे नगर **Year (वर्ष):** 2026

**FIR No. (प्रथम खबर क्र.):** 0474 **Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 29/04/2026 02:57 वाजता

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 12 |
| 2 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence(गुन्ह्याची घटना):**

1 **Day (दिवस):** मंगळवार **Date from (दिनांक पासून):** 28/04/2026 **Date To (दिनांक पर्यंत):** 28/04/2026

**Time Period (कालावधी):** प्रहर ७ **Time From (वेळेपासून):** 19:08 तास **Time To (वेळेपर्यंत):** 19:24 तास

(b) **Information received at P.S. (पोलीस ठाण्यावर माहिती मिळाल्याचा):** **Date (दिनांक):** 29/04/2026 **Time (वेळ):** 01:00 तास

(c) **General Diary Reference (ठाणे दैनंदिनी संदर्भ):** **Entry No. (नोंद क्र.):** 008 **Date and Time (दिनांक आणि वेळ):** 29/04/2026 02:57 तास

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1. (a) **Direction and distance from P.S. (पोलिस ठाण्या पासून दिशा आणि अंतर):** पूर्व, 4 कि.मी. **Beat No. (बीट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** माअधिक्षक अभियंता, एमएसईडीसीए, ओ अँण्ड एम सर्कल,गल्र्स , हायस्कुल चौक अमरावती ,

(c) In case, outside the limit of this Police Station, then Name of P.S. (पोलीस ठाण्याच्या हद्दी बाहेर असल्यास, पोलीस ठाण्याचे नाव):

District (State) (जिल्हा (राज्य)):

6. Complainant / Informant (तक्रारदार / माहिती देणारा):

(a) Name (नाव): श्री. मंगेश पदमाकर मोहोड

(b) Father's/Husband's Name (वडिलांचे/पतीचे नाव):

(c) Date/Year of Birth (जन्मतारीख / वर्ष): 1979

(d) Nationality (राष्ट्रीयत्व):भारत

(e) UID No. (यु.आय.डी. क्र.):

(f) Passport No. (पारपत्र क्र.):

Date of Issue (दिल्याची तारीख ): Place of Issue (दिल्याचे ठिकाण):

(g) ID Details (Ration Card, Voter ID Card, Passport, UID No., Driving License, PAN) (ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पैन कार्ड))

| S. No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्र क्रमांक) |
|---|---|---|

(h) Occupation (व्यवसाय):

(i) Address (पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्ता प्रकार) | Address (पत्ता):: |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | पोलीस उपअधीक्षक, , लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, अमरावती, गाडगे नगर, अमरावती शहर, महाराष्ट्र, भारत |
| 2 | स्थायी पता | पोलीस उपअधीक्षक, , लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, अमरावती, गाडगे नगर, अमरावती शहर, महाराष्ट्र, भारत |

(j) Phone number (फोन नं.): Mobile (मोबाइल क्र.): 91-7741967041

7. **Details of known / suspected / unknown accused with full particulars (ज्ञात / संशयित / अज्ञात आरोपींचे संपूर्ण तपशील):**

**Accused More Than (अज्ञात आरोपी एका पेक्षा जास्त असतील तर संख्या):** 0

| S. No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address(वर्तमान (पत्ता)) |
|---|---|---|---|---|
| 1 | श्री.शामकुमार पाडुंरंग इाटे | | | 1. खत्री याचे घरी किरायाने,स्वावलंबी नगर,कठोरा रोड,Town/Village (शहर / गाव): अमरावती,Tehsil (तहसील): Police Station (पोलीस ठाणे): गाडगे नगर,District (जिल्हा): अमरावती शहर,State (राज्य): महाराष्ट्र,भारत |
| 2 | श्री बाळासाहेब डिगांबर खडारे | | | 1. टेलीकाम कालनी,सुनंदा खरड,याचे घराजवळ,नवाथे,Town/Village (शहर / गाव): अमरावती,Tehsil (तहसील): Police Station (पोलीस ठाणे): राजापेठ,District (जिल्हा): अमरावती शहर,State (राज्य): महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant / informant ( तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे ):**

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S. No. (अ.क्र.) | Propertty Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (विवरण) | Value(In Rs/-) मुल्य (रु. मध्ये) |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | 500 रु चा दराच्या30 नोटा असे एकुण 15,000/ रु | 15,000.00 |

10. Total value of property (In Rs/-) **मालमत्तेचे एकूण मुल्य (रु. मध्ये) :** 15,000.00

11. Inquest Report / U.D. case No., if any **(मरणान्वेषण अहवाल/अकस्मात मृत्यू प्रकरण क्र. जर असल्यास):**

| S. No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.) |
|---|---|

12. First Information contents **(प्रथम खबर हकिगत):**

अप क्रं 474/2026 कलम 7,12 भ्रष्टाचार प्रतीबंध अधिनियम 1988

फिर्यादी - सरतर्फे:- श्री. मंगेश पदमाकर मोहोड, वय-47 वर्श, व्यवसाय -नोकरी, पद - पोलीस उप अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग ,अमरावती. मो-7741967041.

आरोपी- 1)श्री.शामकुमार पाडुंरंग इझाटे, वय 42 वर्षे, पद - कॅम्पुटर ऑपरेटर कंत्राटी, मा.अधिक्षक अभियंता, एमएसईडीसीएल ओ अँण्ड एम सर्कल, गल्र्स हायस्कुल चैक अमरावती रा.श्री खत्री याचे घरी किरायाने, स्ववलंबी नगर, कठोरा रोड अमरावती मुळ पत्ता:- वाॅर्ड क्र 01,

मु.पो.फुबगाव,ता. नांदगाव खंडेश्वर, जि. अमरावती

2)आलोसे श्री बाळासाहेब डिगांबर खंडारे वय 48वर्शे व्यवसाय:- नोकरी उपकार्यकारी अभियंता,

मा.अधिक्षक अभियंता, एमएसईडीसीएल ओ अँण्ड एम सर्कल, गल्र्स हायस्कुल चैक अमरावती

रा. टेलीकाॅम काॅलनी, सुनंदा खरड याचे घराजवळ, नवाथे अमरावती

घटनास्थळ - मा.अधिक्षक अभियंता, एमएसईडीसीएल ओ अँण्ड एम सर्कल, गल्र्स हायस्कुल चौक अमरावती

घतावेळ-दि. दि.28/04/2026 रोजी 19.08 वा ते 19.24वा दरम्याण

दाखल ता वेळ- दि.29/04/2026 चे

दाखल अधिकारी- पोउपनि योगेश श्रीवास पो स्टे गाडगेनगर अम.शहर

हकीकत- मी समक्ष लेखी तक्रार देतो की, मी वर नमुद प्रमाणे असून ला.प्र.वि कार्यालय अमरावती येथे पोलीस उप अधीक्षक म्हणुन दि.07/03/2024 पासुन कार्यरत आहे.

मी दि.28/04/2026 रोजी मी ला.प्र.वि.अमरावती येथे कार्यालयात हजर असताना तक्रारदार श्री स्वप्नील गुनवंतराव मेडशीकर वय 37 वर्शे रा. रवी नगर, राम मंदीर जवळ, श्री पवार याचे चक्की

जवळ अमरावती व्यवसाय:- सोलर स्सिटम ची कामे मो.नं. 9822783123 यांनी तोंडी व लेखी तक्रार दिली की, मी आज दि.28/04/2026 रोजी लाचलुचपत प्रतीबधक विभाग अमरावती या कार्यालयात समक्ष येवुन माझी लेखी तक्रार देतो की मी वरील पत्यावर माझे परीवारासह राहतो आणि भारत ग्रिन एनर्जी नावाने सोलर रुफ टॉप विक्रेता/पुरवठादार म्हणुन काम करतो. सदरचे काम करण्याकरीता आम्हाला महावितरण कार्यालयात नोंदणी आवष्यक असल्यकारणाने मी सर्व प्रक्रीया पार पाडुन माझा अर्ज दि.16/03/2026 रोजी मा.अधिक्षक अभियंता, एमएसईडीसीएल ओ अँण्ड एम सर्कल, गर्ल्स हायस्कुल चैक अमरावती या कार्यालयात सादर केला आहे.

मी अर्ज केल्यानंतर माझे कार्यालयातील महीला कर्मचारी नामे कु निशा रमेश गोहील ही या अर्जाची माहीती घेण्याकरीता मा.अधिक्षक अभियंता, एमएसईडीसीएल ओ अँण्ड एम सर्कल, गर्ल्स हायस्कुल चैक अमरावती या कार्यालयात जात होती. कु निशा रमेश गोहील हीने मला सांगितले की, नोदणिचे काम होण्याकरीता मा.अधिक्षक अभियंता, एमएसईडीसीएल ओ अँण्ड एम सर्कल, गर्ल्स हायस्कुल चैक अमरावतीया या कार्यालयातील कर्मचारी नामे श्री शाम इझाटे हे 20,000/- रुपये लाचेची मागणी करीत आहे.

सदरच्या अर्ज करुन एक महीण्या पेक्षा जास्त कालावधी होउन गेला तरी माझी नोंदणी बाबतचे काम न झाल्याकारणाने मी स्वताः दि.27/04/2026 रोजी माझे नोदणी संबधी कामाची माहीती घेण्याकरीता मा.अधिक्षक अभियंता, एमएसईडीसीएल ओ अँण्ड एम सर्कल, गर्ल्स हायस्कुल चैक अमरावती या कार्यालयात गेलो असता माझी त्या कार्यालयातील लिपीक नामे श्री शाम इझाटे याचे सोबत भेट झाली. त्यांना मी माझे कामा विषयी  विचारणा केली असता त्यांनी मला सांगितले की तुम्हाला जर तुमचे नोदणिचे काम करावयाचे असेल तर तुम्हाला मला 20,000/- दयावे लागतील तरच तमचे काम होणार अन्यथा होणार नाही. माझा त्या वेळी नाईलाज असल्यकारणाने मी त्याना हो म्हटले परंतु मला माझे सोलर रुफ टॉप विक्रेता/पुरवठादार म्हणुन मा.अधिक्षक अभियंता, एमएसईडीसीएल ओ अँण्ड एम सर्कल, गर्ल्स हायस्कुल चैक अमरावती या कार्यालयात नोदणिकरीता त्या कार्यालयातील लिपीक श्री.शाम इजाते यांना 20000/- रुपये लाच देण्याची ईच्छा नाही तरी त्याचे विरुध्द कायदेशिर कारवाई करीता तक्रार देत आहे

माझी मा.अधिक्षक अभियंता, एमएसईडीसीएल ओ अँण्ड एम सर्कल, गर्ल्स हायस्कुल चैक अमरावती या कार्यालयात नोदणिकरीता त्या कार्यालयातील लिपीक श्री शाम  इजाते याचे सोबत कोणतेही वैयक्तीक वैमनस्य नाही तसेच त्याचे सोबत कोणताही उधार उसनवारीचा व्यवहार नाही.हीच माझी तक्रार आहे मी स्वहस्ताक्षरात लिहुन दिली आहे.

त्यावरून आम्ही महाराष्ट्र राज्य मार्ग परीवहन महामंडळ विभागिय कार्यालय, शिवाजी नगर, कॅम्प अमरावती यांना पत्र देवुन 1) श्री. जगदीश तु  ठाकुर, मजुर स्थापथ्य शाखा अमरावती आणि 2) श्री.संजय भिमराव काळे, मजुर स्थापथ्य शाखा अमरावती असे दोन सरकारी पंच बोलविले. सदर दोन सरकारी पंचांना तक्रारदार त्यांचा परिचय करुन दिला. त्यानंतर तक्रारदार यांनी आम्हा व पंचासमक्ष वरीलप्रमाने हकीकत पुन्हा सांगीतली व कागदावर लिहुन लेखी तक्रार आम्हास सादर केली. त्यावर पंच क्र.1 श्री. जगदीश तु  ठाकुर यांनी शेरा लिहुन दोन्ही पंचांनी तक्रारीवर सहया केल्या. त्यानंतर आम्ही तक्रारदार यांना लोकसेवक शामकुमार पांडुरंग इझाटे यांची भेट कधी होईल असे विचारले असता त्यांनी आम्हाला सांगीतले की, लोकसेवक शामकुमार पांडुरंग इझाटे हे

मा.अधिक्षक अभियंता, एमएसईडीसीएल ओ अँण्ड एम सर्कल, गर्ल्स हायस्कुल चैक अमरावतीया कार्यालयात हजर असतात.. तेव्हा आम्ही तक्रारदार, पंच व आमच्या सर्वानुमते पडताळणी कार्यवाही दि.28.04.2026 करण्याचे ठरविण्यात आले. त्यानंतर त्या संदर्भाने सविस्तर पडताळणी पुर्व पंचनामा करण्यात आला त्यात तक्रारदार व दोन्ही पंच यांना सविस्तर सुचना देण्यात आल्या

त्यानंतर पडताळणी कार्यवाही करणेकरीता तक्रारदार यांचे जवळ व्हाईस रेकाॅडर सुरु करुन देवुन त्यांना पंच क्र.1 श्री. जगदीश तु ठाकुर यांचे सह लोकसेवक शामकुमार पांडुरंग इझाटे यांची भेट घेण्यासाठी मा.अधिक्षक अभियंता, एमएसईडीसीएल ओ अँण्ड एम सर्कल, गर्ल्स हायस्कुल चैक अमरावती या कार्यालयात तक्रारदार याचे दोन चाकी वाहणाने लाचलुचपत प्रतीबधक कार्यालय अमरावती येथुन रवाना केले.

काही वेळात तक्रारदार व पंच क्र 01 हे ला.प्र.वि.कार्यालय अमरावती येथे परत आले. त्यानंतर आम्ही तक्रारदार व लोकसेवक श्री शामकुमार पांडुरंग इझाटे यांच्यातील संभाषणाची ऑडीओ क्लिप ऐकली असता त्यात तक्रारदार व लोकसेवक श्री शामकुमार पांडुरंग इझाटे यांच्यात तक्रारीच्या अनुशगाने बोलनी झाल्याचे दिसुन आले. तसेच इतर लोकसेवक श्री शामकुमार पांडुरंग इझाटे यांनी तक्रारदार यांना त्याचे नोदणिचे काम करुन देण्याकरीता 15,000/- रुपये लाचेची मागणी केल्याचे निश्पन्न झाले तसेच लोकसेवक श्री बाळासाहेब डिगांबर खंडारे, उपकार्यकारी अभियंता, यांनी लाच मागणीस होकार देवुन त्याना प्रोत्साहन दिल्याचे निपन्न झाले.

त्यांनतर आम्ही इतर लोकसेवक श्री शामकुमार पांडुरंग इझाटे आणि लोकसेवक श्री बाळासाहेब डिगांबर खंडारे यांचेवर सापळा कारवाई करायची असल्याने तक्रारदार यांना लाचेची रक्कम 15,000/-रू हजर करण्यास सांगीतले असता त्यांनी 15,000/-रुपये ज्यामध्ये 500 रुपये दराच्या 30 नोटा हजर केल्या. त्या नोटांचे क्रमांक आम्ही पंच क्र.2 श्री.काळे यांना वाचण्यास सांगुन पंच क्र.1 श्री. ठाकुर यांना को-या कागदावर क्रमांक लिहिण्यास लावले व त्यावर पंचांनी व आम्ही सहया केल्या.

त्यांनतर आमच्या सुचनेवरून स्टाफ वैभव जायले यांनी तक्रारदार यांनी हजर केलेल्या नोटाला अँन्थ्रासीन पावडर लावुन प्रात्यक्षिक करून तसेच तक्रारदार व पंचाना अल्ट्राव्हायलेट लॅम्प बाबत माहीती दिली व सापळापुर्व पंचनामा करण्यात आला. त्यानंतर सापळा पंचनाम्या दरम्यान हजर केलेल्या लाच रक्कमेला अँथ्रासिन पावडर लावुन लाच रक्कम तक्रारदार यांच्या पॅंटच्या समोरील उजव्या बाजुच्या खिषामध्ये ठेवुन दिली. आणि पोकाॅ.शैलेश कडु यांनी व्हाईस रेकाॅर्डर सुरु करुन देवून, तक्रासदार व पंच क्र.1 श्री.ठाकुर यांना तक्रारदार यांच्या दुचाकी वाहनाने इतर लोकसेवक श्री शामकुमार पांडुरंग इझाटे आणि लोकसेवक श्री बाळासाहेब डिगांबर खंडारे याचे यांची भेट घेण्याकरीता मा.अधिक्षक अभियंता, एमएसईडीसीएल ओ अँण्ड एम सर्कल, गर्ल्स हायस्कुल चैक अमरावती येथे रवाना केले.

त्यानंतर आम्ही व सापळा पथकातील इतर अधिकारी व कर्मचारी हे शासकीय वाहनाने मा.अधिक्षक अभियंता, एमएसईडीसीएल ओ अँण्ड एम सर्कल, गर्ल्स हायस्कुल चैक अमरावती कार्यालयाच्या आजुबाजुला आडोसा घेवुन थांबले. तेव्हा तक्रारदार व पंच क्र.1 श्री.ठाकुर यांची इतर लोकसेवक श्री शामकुमार पांडुरंग इझाटे यांचे सोबत कार्यालयाचे बाहेर गेट समोर भेट झाली.त्यानंतर तक्रारदार व इतर लोकसेवक श्री शामकुमार पांडुरंग इझाटे यांचे तक्रारदार याचे कामाच्या अनुशंगाने

बोलणे झाले आणि इतर लोकसेवक श्री शामकुमार पांडुरंग इझाटे यांनी तक्ररदार याचे कडुन लाचेची रक्कम स्विकारल्यानंतर तक्रारदार यांनी लाच रक्कम स्विकारल्याचा पुर्व नियोजीत इशारा केल्याने सापळा पथकातील अधिकारी कर्मचारी आणि पंच क्र 02 त्या ठिकाणी पोहलचे. आम्ही इतर लोकसेवक श्री शामकुमार पांडुरंग इझाटे यांना आमचा व संपुर्ण सापळा पथकाचा परीचय दिला. त्याना त्याचे संपुर्ण नाव व पत्ता विचारला., तसचे लाचेची रक्कम पंचा मार्फत इतर लोकसेवक श्री शामकुमार पांडुरंग इझाटे यांच्या कडुन ताब्यात घेवुन त्याची पंचा मार्फत खात्री करुन ती इतर लोकसेवक श्री शामकुमार पांडुरंग इझाटे यांचे कडुन जप्त केली. वरील सर्व केलेल्या सर्व कारवाईचा सविस्तर सापळा पुर्व व सापळा पंचनामा करण्यात आला.

1. एकदरीत तक्रारदर यांनी दि.28/04/2026 रोजी दिलेल्या तक्रारीची शासकीय पंचा संमक्ष पडताळणी केली असता इतर लोकसेवक श्री शामकुमार पांडुरंग इझाटे यांनी तक्ररदार यांना 15,000/-रुपये लाचेची मागणी करुन ते स्वीकारण्याचे मान्य केले तसेच लोकसेवक श्री बाळासाबेब डिगांबर खंडारे यांनी इतर लोकसेवक श्री शामकुमार पांडुरंग इझाटे याना प्रोत्साहण दिले आणि लाच मागणीस होकार दिला.असे पडताळणी कारवई वरुन निश्पन्न झाल्याने तसेच सापळा कारवाई दरम्यान इतर लोकसेवक श्री शामकुमार पांडुरंग इझाटे यानी तक्रारदार यांना लाचेची मागणी करुन लाचेची रक्कम 15,000/- रुपये मा.अधिक्षक अभियंता, एमएसईडीसीएल ओ अँण्ड एम सर्कल, गर्ल्स हायस्कुल चैक अमरावती या कार्यालयचे स्विकारल्याने इतर लोकसेवक श्री.शामकुमार पाडुंरंग इझाटे, वय 42 वर्षे, पद - कॅम्पुटर ऑपरेटर कंत्राटी, मा.अधिक्षक अभियंता, एमएसईडीसीएल ओ अँण्ड एम सर्कल, गर्ल्स हायस्कुल चैक अमरावती रा.श्री खत्री याचे घरी किरायाने, स्ववलंबी नगर, कठोरा रोड अमरावती मुळ पत्ता:- वाॅर्ड क्र 01, मु.पो.फुबगाव, ता. नांदगाव खंडेश्वर, जि. अमरावती आणि आलो ऐसे श्री बाळासाहेब डिगांबर खंडारे वय 48वर्षे व्यवसाय:- नोकरी उपकार्यकारी अभियंता, मा.अधिक्षक अभियंता, एमएसईडीसीएल ओ अँण्ड एम सर्कल, गर्ल्स हायस्कुल चैक अमरावती रा. टेलीकाॅम का ॅलनी, सुनंदा खरड याचे घराजवळ, नवाथे अमरावती यांचे विरूध्द माझी कलम 7,12 भ्रश्टाचार प्रतीबंधक कायदा 1988 नुसार कायदेशिर फिर्याद आहे.

माझी वरिल प्रमाणे फिर्याद लॅपटाॅपवर टाईप केली असुन त्याची प्रिंट काढूण ती मी वाचुन पाहीली, माझ्या सांगण्याप्रमाणे बरोबर व खरी टाईप केली आहे.

**13. Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.**
**(केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध दिसून आल्यामुळे):**

(1) **Registered the case and took up the investigation (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):** **or (किंवा):**

(2) **Directed (Name of I.O.) (तपास अधिका-याचे नाव):** **Rank (हुद्दा):** पोलीस निरीक्षक
Vijaya Dawalu Pandhare

No. (क्र.): to take up the Investigation (तपास करण्याचे अधिकार दिले) or (किंवा)

(3) Refused investigation due to (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला): or (किंवा)

(4) Transferred to P.S. (गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

District (जिल्हा): on point of jurisdiction (अधिकाराच्या दृष्टिकोनातून).

F.I.R. read over to the complainant / informant, admitted to be correctly recorded and a copy given to the complainant /informant, free of cost. (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली)

R.O.A.C. (आर.ओ.ए.सी.)

Registered by (नोंदणी अधिकारी)

Signature of Officer in charge, Police Station (ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

Name (नाव): Gorakhnath Ramnath Jadhav

Rank (हुद्दा): I (Inspector)

No. (क्र.): 14801000362GRJM7401S

14. Signature / Thumb impression of the complainant / informant (तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा)

15. Date and time of dispatch to the court (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):